**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार    दिनांक ०९  जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पूर्व विदर्भातील पूरस्थिती नियंत्रणात: एसडीआरएफ आणि एनडीआरएफ यंत्रणा सज्ज,नागरिकांनी सुरक्षेची काळजी घ्यावी: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन.**

2. **नागपूरसह पूर्व विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात उद्या देखील मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

3. **आदिवासी जमिनींच्या गैरहस्तांतरणाची चौकशी, तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं आश्वासन.**

4. **वर्धा जिल्ह्यातील वायगाव हळदीच्या ब्रँडींगसाठी  पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचं  केंद्रीय मंत्र्यांना पत्र.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मुख्यमंत्री पूर परिस्थिती  + पूर्व विदर्भ पाऊस

विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून शासनाने बचाव आणि मदतकार्य सुरू केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न सदस्य नाना पटोले यांनी उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले...

***खूप मोठ्या प्रमाणात पुराची परिस्थिती निर्माण झाली आहे. तथापि, ज्या ठिकाणी एसटीच्या बसेस अडकलेल्या होत्या तिथल्या पॅसेंजरला काढून तिथल्या नजीकच्या शाळेमध्ये त्यांना रात्री ठेवल. त्यांची सगळी व्यवस्था केली. आता त्यांना पाठवण्याची व्यवस्था केलेली आहे. गडचिरोली पासून नागपूरकडे वाया आरमोरी जोर असते. तो रस्ता बंद जो रेग्युलर रस्ता अजून सुरु आहे. त्यामुळे आता  त्या रेग्युलर रस्त्याचा वापर चाललेला आहे. गोसीखुर्दचं पाणी सोडलं त्यावेळी आपण ते पाणी जितपर्यंत जाऊ शकत गडचिरोलीपर्यंत सगळ्यांना अलर्ट दिलेला आहे. एसडीआरएफ आणि एनडीआरएफ दोघांना स्टँड बाय ठेवलेला आहे.***

नागपूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट असल्याने संबंधित यंत्रणांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री यांनी केल दरम्यान, नागपुरात विकास कामे झाली असतील तर पूरपरिस्थिती का उद्‌भवली, असा सवाल काँग्रेस नेते विकास ठाकरे यांनी केला आहे.

***घरात पाणी शिरलं आहे. अन्नधान्य चाललं आहे वाहून मला वाटतं की या नागपूर शहरामध्ये 15 वर्ष महानगरपालिका ,केंद्राचे 10 वर्षाचे मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या विविध कार्यक्रमामधले दावे की एक लाख कोटीचे काम केले आहे. मग ह्या एक लाख कोटीचे काम केल्यानंतर हि नागपूरची परिस्थिती का अशी आहे***
नागपुरात सलग तिसऱ्या दिवशी आज पावसाची संततधार सुरू आहे. हवामान विभागाने आज नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला होता; त्याप्रमाणे या तिन्ही जिल्ह्यात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली.
नागपुरातील नरेंद्र नगर पुलाच्या खाली पाणी भरल्याने त्या मार्गावरून वाहतूक वळती करण्यात आली आहे. सकाळी धनगौरी नगर, पवारी, पुनापूर, येथे पाण्यात अडकलेल्या 4 व्यक्तींना बाहेर काढण्यात आले. नागपूरच्या उमरेड रोडवरील पवनगाव येथे पावसाच्या पाण्यात अडकलेल्या 12 जणांना बचाव पथकाने बाहेर काढले. नागपूर रेल्वे स्थानकात पाणी भरल्याने रेल्वे सेवा देखील प्रभावित झाली आहे. पूर्व नागपूरच्या हिवरीनगर आणि इतर सखल भागात पाणी शिरले आहे. कळमेश्वर तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे एका जणाचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. वर्धाच्या देवळी येथील यशोदा नदीला पूर आल्याने सरुळ पुलावरून नदीचे पाणी वाहत असून वर्धा ते राळेगाव रस्ता बंद झाला आहे. वर्धा जिल्ह्याच्या लाल नाला प्रकल्पाचे 2 दरवाजे उघडण्यात आले असून यातून 10 सेंटिमीटरने पाण्याचा विसर्ग चालू आहे. वर्धाच्या यशोदा नदी पात्राजवळ ४ मजूर अडकले होते. त्यांना बचाव पथकातर्फे सुखरूप बाहेर काढण्यात आल अकोला जिल्ह्यात संभाव्य वृष्टी लक्षात घेता पूर्णा, मोर्णा, निर्गुणा, काटेपूर्णा, मन, पठार, गौतमा आदी नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यात सुमारे १७ राष्ट्रीय, राज्य आणि इतर मार्ग पूर परिस्थितीमुळे बंद करण्यात आले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील मागील चार दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू असून आज सडक-अर्जुनी येथे एक झाड चारचाकी वाहनावर कोसळल्याने आत बसलेल्या दोघांचा मृत्यू झाला. पुरामुळे काही गावांचा संपर्क तुटला आहे. दरम्यान, जिल्ह्यात भात शेती पाण्याखाली गेल्याने शेतकरी चिंतेत आहे.

*चार दिवसांपासून हा जो मुसळधार पाऊस सुरू आहे. त्याच्यामध्ये मी साडेतीन एकर शेती लावली होती.त्याच्यामध्ये पूर्ण धान माझ डुबलेला आहे आणि हा धान पूर्ण आता सडणार आहे. याच्यापैकी आम्हाला काही आता अपेक्षा नाही आहे कारण पूर्ण धाण सडलेला आहे. चार दिवसापासून धान पूर्ण डुबलेला आहे.तर शासनाने आमच्या धाना येऊन शेतामध्ये येऊन आमच्या शेताचे पंचनामे द्यावे व त्वरित तो आम्हाला मोबदला भरून द्यावा किंवा आर्थिक मदत आणि उचित आम्हाला न्याय द्यावा.*

यवतमाळमध्ये 3 दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असल्याने मारेगाव तालुक्यातील कोसारा वर्धा नदीवरील पूल पाण्याखाली आला आहे. पुलावरून दोन ते तीन फूट पाणी वाहत असल्याने राळेगाव- वडकी- खैरी- कोसारा- वरोरा- चंद्रपूर मार्ग बंद पडला आहे. भंडारा जिल्ह्यात गेल्या तीन दिवसापासून पावसाची संततधार सुरू होती; त्यामुळे जिल्ह्यातील नदी नाले ओसंडून वाहत आहेत, तर काही गावांना पुराच्या पाण्याचा वेढा आहे. जिल्ह्यातील 38 मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथे 172.50 मिलीमीटर इतकी झाली. दरम्यान, जिल्ह्यात पुरात अडकलेल्या 71 जणांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं. उद्या पूर्व विदर्भाच्या नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे तर वर्धा येथे जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा या सर्व जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

शिक्षकांचं आंदोलन

अनुदानित शाळांना टप्पा अनुदान वेळेवर मिळावं, यासाठी मुंबईत शिक्षकांनी आंदोलन केलं. त्यावर मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होणार असून त्यात त्यावर तोडगा काढण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली. याबाबतचा प्रश्न विजय देशमुख यांनी उपस्थित केला होता.

बावनकुळे

राज्यातील आदिवासींच्या जमिनींच्या बिगर आदिवासींकडे झालेल्या गैरहस्तांतरणाच्या प्रकरणांची सखोल चौकशी करून पुढील तीन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल, असे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिलं.आमदार राजेंद्र गावित यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूलमंत्री म्हणाले की, १९७४ मध्ये लागू झालेल्या कायद्यानुसार

आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण करण्यात आले होते. परंतु १९७४ ते २००४ या ३० वर्षांच्या काळात जर कोणतीही जमीन बेकायदेशीररीत्या बिगर आदिवासींनी घेतली असेल, तर २०३४ पर्यंत त्या प्रकरणाची तक्रार शासनाकडे करता येऊ शकते. २०२१ ते २०२३ या काळात सुमारे ६१७ जमिनीचं गैरहस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी ४०४ जमिनी परत करण्यात आल्या असून २१३ प्रकरणे सध्या जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत. संबंधित यादी शासनाकडे असून ती लवकरच सर्व आमदारांना देण्यात येईल, असेही बावनकुळे म्हणाले.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

वर्धा जिल्हयातील समुद्रपूर तालुक्यातील वायगांव हळदीला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळावी आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा, यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेतला आहे. वायगांव हळदीच्या ब्रँडींगसाठी पालकमंत्र्यांनी केंद्रीय वाणिज्य आणि  उद्योग मंत्री पियुष गोयल यांना पत्र पाठवून वायगांव हळदीची महती सांगितली असून तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी म्हणून प्रसिद्धी देण्याची विनंती केली.भौगोलिक मानांकन मिळालेल्या वायगाव हळदीची पहिली निर्यात नुकतीच पालकमंत्री  डॉ. भोयर यांच्या हस्ते दुबई येथे करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी आणि प्रक्रिया केलेल्या अन्न उत्पादनांच्या निर्यात विकास प्राधिकरणाच्या प्रथमच निर्यात प्रोत्साहन योजनेंतर्गत ही निर्यात करण्यात आली.

ऑनलाईन कर

ऑनलाईन कर सवलतीच्या पहिल्या मोहिमेला नागरिकांना चांगला प्रतिसाद दिल्यानंतर आता नागपूर महानगरपालिकेने कर सवलतीची मोहीम ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. आता या मुदतीपर्यंत चालू आर्थिक वर्षासाठी ऑनलाईन मालमत्ता कर भरणाऱ्या करदात्यांना १० टक्के तर ऑफलाईन करदात्यांना ५ टक्के सवलतीचा लाभ दिला जाणार आहे.

तिरंदाजी

स्पेनमध्ये माद्रिद इथं झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यात भारताच्या ऋषभ यादव आणि ज्योति सुरेखा वेन्नम यांच्या कामगिरीने भारताला पहिलं स्थान मिळवून दिलं. ऋषभनं ७१६ गुणांसह, तर ज्योतीनं ७१५ गुणांसह सर्वोच्च स्थान मिळवलं.

बच्चू कडू

बच्चू कडू यांची सातबारा कोरा यात्रा संततधार पावसामध्ये यवतमाळ जिल्हयात सुरू आहे.  हिंदी सक्तीचा जीआर मराठी भाषिकांचा मोर्चा निघण्याआधीच रद्द झाला;

मात्र रोज शेतकरी अडचणीत असताना सरकार मात्र किंतु परंतु ची भाषा करीत असल्याने, आता लाठीकाठी घेऊन सरकारला हिसका दाखवा, असे आवाहन कडू यांनी केले. उपोषण, पदयात्रा झाल्यावरही सरकार कर्जमाफी देत नसेल, तर गांधी जयंतीला आक्रमक होण्याचा इशारा कडू यांनी दिला.

सामंजस्य करार

असोसिएट एनसीसी अधिकाऱ्यांना आता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची पदविका प्राप्त होणार आहे. याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि देशातील एकमेव असलेल्या एनसीसी ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी कामठी यांच्या दरम्यान काल सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे देशभरातील एनसीसी अधिकाऱ्यांना आता मान्यताप्राप्त पदविका मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जलोत्सव

पावसाळ्यात पाण्याचं व्यवस्थापन करण्यासाठी वाशिम जिल्हयात 'जलोत्सव' हवि शेष अभियान सुरू करण्यात आलं आहे. या अभियानांतर्गत, नागरिकांनी आपल्या घरात, परिसरात किंवा शेतीत तयार केलेल्या जनपुनर्भरण संरचनांचे २० ते ३० सेकं दांचे व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करण्याचं आवाहन वाशिमच्या जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केलं आहे.

******